# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
## विस्तार शिक्षण संचालनालय

विशिसं/1171/2025
दि.14.11.2025

प्रति
1. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, परभणी/छ.संभाजीनगर/जालना/हिंगोली/ लातूर/नांदेड/बीड/धाराशीव
2. कृषि विस्तार विद्यावेत्ता, विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्र, छ.संभाजी नगर/लातूर/अंबाजोगाई/परभणी
3. कार्यक्रम समन्वयक/वरिष्ठ शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र, छ.संभाजीनगर-1/ बदनापूर/खामगाव/तुळजापूर/एमजीएम, गांधेली, छ.संभाजीनगर/खरपूडी, जालना/तोडापूर, हिंगोली/पोखर्णी फाटा, नांदेड/सगरोळी, नांदेड/लातूर/परभणी/डिघोळआंबा, अंबाजोगाई

विषय :- प्रगतशील शेतक-यांना "वनामकृवि शेतकरी फेलो" पुरस्कार प्रदान करणे बाबत..

वैज्ञानिक शेती व्यवस्थापन, सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब, नवकल्पना आणि ज्ञान प्रसाराच्या माध्यमातून कृषी क्षेत्राच्या विकासात लक्षणीय योगदान दिलेल्या प्रगत व नवोन्मेषी शेतकऱ्यांचा वनामकृवि शेतकरी फेलो पुरस्कार देवून गौरव करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. त्याकरिता , वनामकृवि, परभणी अर्ज मागवत आहे. विहित नमुन्यात भरलेला मुळ अर्ज योग्य त्या कागदपत्रासह संचालक, विस्तार शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे नावे दि.28.11.2025 पर्यंत प्राप्त होणे गरजेचे आहे. अर्जाची झेरॉक्स प्रत, ई-मेल, व्हॉटसअॅप किंवा इतर माध्यमाद्वारे पाठविलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

अर्जाचा नमुना, अटी व शर्ती सोबत पाठविण्यात येत आहेत. आपणामार्फत सदरील बाबीस प्रसिदधी देवून शेतक-यांच्या निदर्शनास आणून सहकार्य करावे.

**सोबत :** वरीलप्रमाणे

**संचालक**
**विस्तार शिक्षण**

**प्रत :-**
1. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), वनामकृवि, परभणी.
2. संचालक संशोधन, वनामकृवि, परभणी.
3. विभागीय कृषि सहसंचालक, कृषि विभाग, छ.संभाजीनगर/लातूर.
4. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदरील बाबीस विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिदधी देण्यात यावी.
5. मा.कुलगुरु, वनामकृवि, परभणी यांचे खाजगी सचिव.

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
## अर्ज / Application Form
## शेतकरी फेलो पुरस्कार 2025

---

### 1. अर्जदाराची माहिती

पासपोर्ट फोटो

1. अर्जदाराचे पूर्ण नाव (मराठी व इंग्रजीत): ______________________________
______________________________
2. पत्ता: ______________________________
3. तालुका: ______________ जिल्हा: ______________
4. मोबाईल क्रमांक: ______________ ई-मेल (असल्यास): ______________
5. जन्मतारीख: ______________ वय: ______________
6. शिक्षण: ______________________________
7. शेतीचा अनुभव (वर्षांमध्ये): ______________________________

### 2. शेतीची माहिती

1. एकूण शेती क्षेत्रफळ (एकर/हे.): 1. बागायती ______________
   2.कोरडवाहू ______________
2. प्रमुख पिके: ______________________________
3. पद्धती (सेंद्रिय / पारंपरिक / आधुनिक / मिश्र): ______________
4. सिंचन साधने: ______________________________
5. पशुधन: ______________________________
6. प्रमुख जोडधंदे: ______________________________
______________________________
______________________________
______________________________

## 3. उल्लेखनीय कार्य

1. शेती/जोडधंद्यातील अवलंब व नवकल्पना (आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, नवीन वाणांचा वापर, यांत्रिकीकरण, संसाधन कार्यक्षमतेत सुधारणा, स्थानिक नवकल्पना):

______________________________________________

______________________________________________

2. उत्पादनक्षमता व नफा (स्थानिक सरासरीपेक्षा उत्पादन, गुणवत्ता किंवा उत्पन्नात वाढ; शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब):

______________________________________________

______________________________________________

3. तंत्रज्ञान प्रसार व नेतृत्व (इतर शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे, प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, शेतकरी-शास्त्रज्ञ संवादात सहभाग):

______________________________________________

______________________________________________

4. संस्थांशी सहकार्य (कृषी विज्ञान केंद्रे, संशोधन केंद्रे, विस्तार कार्यक्रम व शासकीय योजनांशी सहभाग):

______________________________________________

______________________________________________

5. सामाजिक-आर्थिक परिणाम व शाश्वतता (ग्रामीण उपजीविकेत योगदान, महिला/युवक सक्षमीकरण, शेतकरी उत्पादक गट, उपक्रम, हवामान-आधारीत शेती):

______________________________________________

______________________________________________

6. सन्मान / पुरस्कार / प्रकाशने (जिल्हा / राज्य / राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार, गौरवपत्रे, उल्लेख):

______________________________________________

______________________________________________

## 4. संलग्न कागदपत्रे (कृपया ✓ चिन्ह लावा)

☐ पूर्ण भरलेला अर्ज नमुना
☐ कुटूंबाच्या मालकीचा सातबारा उतारा/8-अ उतारा
☐ आधार कार्ड प्रत
☐ जीवन परिचय व शेत प्रोफाईल
☐ नवकल्पना / कामगिरीचे पुरावे
☐ छायाचित्रे / अभिप्राय / प्रमाणपत्रे

## 5. अर्जदाराची घोषणा

मी शेतकरी फेलो या पुरस्काराकरिता निर्धारीत केलेल्या अटी व शर्तींचे वाचन केलेले असून वरील सर्व माहिती सत्य असल्याची खात्री देतो/देते. चुकीची माहिती दिल्यास माझा अर्ज रद्द करण्यात यावा यास मी सहमती देतो/देते.

दिनांक :                                        अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी: ____________________

## 6. नामांकन प्रमाणिकरण संस्थेची माहिती

1. संस्थेचे नाव: ______________________________
2. पत्ता: ______________________________
3. संपर्क क्रमांक / ई-मेल: ______________________________
4. अधिकाऱ्याचे नाव व स्वाक्षरी: ______________________________
5. शिक्का: ____________________
6. दिनांक: ____________________

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

## शेतकरी फेलो पुरस्कार – नामांकन, मूल्यमापन, निकष, अटी व शर्ती

### 1. उद्दिष्ट

वैज्ञानिक शेती व्यवस्थापन, सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब, नवकल्पना आणि ज्ञान प्रसाराच्या माध्यमातून कृषी क्षेत्राच्या विकासात लक्षणीय योगदान दिलेल्या प्रगत व नवोन्मेषी शेतकऱ्यांचा वनामकृवि शेतकरी फेलो पुरस्कार देवून गौरव करणे आणि त्यांना सन्मानित करण्याकरिता वनामकृवि, परभणी अर्ज मागवत आहे. विहित नमुन्यात भरलेला मुळ अर्ज योग्य त्या कागदपत्रासह संचालक, विस्तार शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे नावे दि.28.11.2025 पर्यंत पाठविण्यात यावा. अर्जाची झेरॉक्स प्रत, ई-मेल, व्हॉटसअॅप किंवा इतर माध्यमाद्वारे पाठविलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

### 2. पात्रता

- उमेदवार हा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रत्यक्ष शेती करणारा असावा.
- किमान **१० वर्षांचा शेतीचा अनुभव** असावा.
- पिके, पशुपालन, बागायती किंवा संलग्न क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय यश मिळविलेले असावे.
- विद्यापीठ / कृषी विज्ञान केंद्र (KVK) / संशोधन केंद्रे यांच्यासोबत तंत्रज्ञान चाचणी किंवा प्रसार कार्यात सहकार्य केलेले असावे.
- उमेदवाराचे चारित्र्य उत्तम असावे व तो आपल्या परिसरात आदर्श शेतकरी म्हणून ओळखला जात असावा.

### 3. नामांकन प्रक्रिया

नामांकनाकरिता विहित नमुन्यातील अर्ज खालीलपैकी एका संस्थेमार्फत पाठविण्यात यावा.

- कृषी विज्ञान केंद्रे / संशोधन केंद्रे / विस्तार शिक्षण प्रकल्प
- शासकीय कृषि विभाग/आत्मा
- स्वयंसेवी संस्था / शेतकरी उत्पादक संस्था (FPOs) / सहकारी संस्था

नामांकन प्रस्तावात पुढील कागदपत्रे आवश्यक आहेत:

1. पूर्ण भरलेला अर्ज नमुना
2. कुटूंबाच्या मालकीचा सातबारा उतारा/8-अ उतारा
3. आधार कार्ड
4. शेतकऱ्याचा संक्षिप्त जीवन परिचय
5. नवकल्पना / कामगिरीची पुरावे
6. छायाचित्रे / अभिप्राय / प्रमाणपत्रे

## 4. मूल्यमापन निकष व गुणांकन प्रणाली

| क्र. | निकष | वर्णन / निर्देशक | कमाल गुण |
|---|---|---|---|
| 1 | शेती/जोडधंदा अवलंब व नवकल्पना | आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, नवीन वाणांचा वापर, यांत्रिकीकरण, संसाधन कार्यक्षमतेत सुधारणा, स्थानिक नवकल्पना. | 25 |
| 2 | उत्पादनक्षमता व नफा | स्थानिक सरासरीपेक्षा उत्पादन, गुणवत्ता किंवा उत्पन्नात वाढ; शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब. | 20 |
| 3 | तंत्रज्ञान प्रसार व नेतृत्व | इतर शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे, प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, शेतकरी-शास्त्रज्ञ संवादात सहभाग. | 20 |
| 4 | संस्थांशी सहकार्य | कृषी विज्ञान केंद्रे, संशोधन केंद्रे, विस्तार कार्यक्रम व शासकीय योजनांशी सहभाग. | 15 |
| 5 | सामाजिक-आर्थिक परिणाम व शाश्वतता | ग्रामीण उपजीविकेत योगदान, महिला/युवक सक्षमीकरण, FPO उपक्रम, हवामान-लवचिक शेती. | 10 |
| 6 | सन्मान / पुरस्कार / प्रकाशने | जिल्हा / राज्य / राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार, गौरवपत्रे, उल्लेख. | 10 |
| | | **एकूण** | **100** |

**किमान पात्रता गुण:** 100 पैकी 70

## 5. निवड प्रक्रिया

1. स्क्रिनिंग समिती नामांकनांची प्राथमिक तपासणी करील.
2. मूल्यमापन समिती आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष पाहणी करून गुणांकन निश्चित करील.
3. समितीच्या शिफारशींची अंतिम मान्यता मा.कुलगुरू, वनामकृवि, परभणी यांच्याकडून घेतली जाईल.

## 6. पुरस्काराचे घटक

**पुरस्कार :** "शेतकरी फेलो, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ"

पुरस्कारामध्ये समाविष्ट : विद्यापीठाने निश्चित केल्याप्रमाणे

- प्रमाणपत्र/ गौरवपत्र
- स्मृतिचिन्ह / पदक

***(पुरस्काराची संख्या ठरविणे, पुरस्काराचे स्वरुप बदलने अथवा संपूर्ण पुरस्कार प्रक्रीया रद्य करण्याचे अधिकार कृषि विद्यापीठास राहतील)***

## 7. विद्यापीठाशी बांधिलकी

"शेतकरी फेलो" म्हणून निवड झालेल्या शेतकऱ्याने पुढील किमान **तीन वर्षे** विद्यापीठाच्या प्रसार कार्यात, सहभागी संशोधन कार्यक्रमांमध्ये व शेतकरी प्रशिक्षणांमध्ये **"शेतकरी संसाधन व्यक्ती"** म्हणून योगदान द्यावे लागेल.

दिनांक :

शेतक-याचे नाव व स्वाक्षरी: ____________________